<u>नियमित फौजदारी खटला क्र. ३४५/२०२५</u>
<u>निशाणी क्र. १७</u>

<u>**दोषारोप**</u>

मी, वाय. जे. तांबोळी, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोपरगाव, याव्दारे तुम्ही आरोपी

१. बाळु विलास सुपेकर,
वय– २८ वर्षे, धंदा– मजुरी,

२. विलास बबन सुपेकर,
वय– ५६ वर्षे, धंदा– मजुरी,

३. लक्ष्मी विलास सुपेकर,
वय– ५२ वर्षे, धंदा– शेती,

४. मनोज विलास सुपेकर,
वय– ३२ वर्षे, धंदा– शेती,

५. संगिता मनोज सुपेकर,
वय– २६ वर्षे, धंदा– घरकाम,

६. प्रसाद विलास सुपेकर,
वय– ३० वर्षे, धंदा– शेती,

७. सविता प्रसाद सुपेकर,
वय– २४ वर्षे, धंदा– घरकाम,
सर्व आ. रा. वारजे माळवाडी,
शिवाजी चौक टॉवर लाईन जवळ, पुणे.

यांचेवर आरोप ठेवतो की,

**१.** दिनांक ३०–०१–२०२३ ते १७–०८–२०२४ चे दरम्यान वारजे माळवाडी, शिवाजी चौक टॉवर लाईन जवळ, पुणे येथे तुम्ही आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस वेळोवेळी काहीएक कारण नसताना मारहाण व शिवीगाळ करुन तिचा शारीरिक व मानसिक छळ केला आणि त्याव्दारे तुम्ही **भारतीय दंड संहिताचे कलम ४९८–अ सह कलम ३४** खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

**२.** उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस आपखुशीने दुखापत केली आणि त्याव्दारे तुम्ही **भारतीय दंड संहिताचे कलम ३२३ सह कलम**

**३४** खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

**३.** उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीने प्रक्षुब्ध होउन तिने सार्वजनिक शांततेचा भंग करावा अथवा तिचे हातून कोणता तरी अपराध घडावा या हेतूने फिर्यादीस अपमानीत केले आणि त्याव्दारे तुम्ही **भारतीय दंड संहिताचे कलम ५०४ सह कलम ३४** खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

**४.** उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस धमकी देवून फौजदारी धाकदपटशा केला आणि त्याव्दारे तुम्ही **भारतीय दंड संहिताचे कलम ५०६ सह कलम ३४** खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

आणि मी याव्दारे असा निर्देश देतो की, उक्त दोषारोपावरुन तुमची या न्यायालयाव्दारे संपरिक्षा करण्यात यावी.

YOUNUS JAFAR TAMBOLI Digitally signed by YOUNUS JAFAR TAMBOLI Date: 2025.11.15 10:30:40 +0530

दिनांकः १३/११/२०२५.
कोपरगाव.

( वाय.जे. तांबोळी )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोपरगाव.
अहमदनगर.

## प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त आरोप हे आरोपींना त्यांच्या मातृभाषेतून वाचून व समजावून सांगण्यात आले.

YOUNUS JAFAR TAMBOLI Digitally signed by YOUNUS JAFAR TAMBOLI Date: 2025.11.15 10:30:57 +0530

दिनांकः १३/११/२०२५.
कोपरगाव.

( वाय.जे. तांबोळी )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोपरगाव.
अहमदनगर.